www.rajdand.com
सातारा रविवार
१४.१.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# मनसेच्या मेळाव्यात 'जय श्रीराम'चा नारा

## २२ जानेवारीला उत्सव साजरा करण्याचे राज ठाकरेंचे आवाहन

**पुणे :** अयोध्येत २२ तारखेला श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा होत आहे. मला तिथे राम मंदिर होण्यापेक्षा हे महत्त्वाचं वाटतेय की, ज्या कारसेवकांनी तिथे कष्ट घेतले, त्यांचे स्वप्न सत्यात उतरत आहे. त्या कारसेवकांसाठी कुणालाही त्रास न देता त्या दिवशी पूजा अर्चा करावी, अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमाबद्दल मनसेने आता आपली अधिकृत भूमिका जाहीर केली आहे.

स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बाळा नांदगावकर, अनिल शिदोरे, पुणे शहराध्यक्ष साईनाथ बाबर, वनिता बाविस्कर, अजय शिंदे, गणेश सातपुते आदी उपस्थित होते. श्रीरामचंद्राची मुर्ती भेट देत ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले. राज ठाकरे यांनी मेळाव्यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आगामी काळात ग्रामपंचायतीबाबत आणखी गांभीर्यानं विचार करण्याची गरज व्यक्त केली.

ते म्हणाले, 'स्थानिक समस्या तुम्हाला माहीत असून, स्वअनुभवातूनच तुम्ही त्या सोडवाल याची मला खात्री आहे. माझी फक्त एकच विनंती आहे, तुमचे गाव स्वच्छ ठेवा. अनेक भागांत स्वच्छतेसंबंधी दुरवस्था झाली आहे. अस्वच्छ वातावरणामुळे मन देखील अस्वच्छ होते. जगण्याची ऊर्मी ही भोवतालच्या वातावरणामुळे तयार होते. गावाचे वातावरण बदलून टाका आणि सर्वांची कामे करा.' मनसेच्या हातातील सर्वात स्वच्छ ग्रामपंचायतीला पाच लाखाचा निधी मी स्वतः देईल, असे ठाकरे यांनी यावेळी जाहीर केले.

### दुष्काळाची कामे करा...

**राज्यात एप्रिल-मे महिन्यात मोठ्या प्रमाणावर दुष्काळाची स्थिती असेल, याची जाणीव अनिल शिदोरे यांनी कार्यकर्त्यांना करून दिली. ते म्हणाले, ''दुष्काळाच्या तीव्र टंचाईतच निवडणुकांचा कालावधी आहे. या काळात घोषणा, सभा आणि देखाव्यात सर्वसामान्य दुष्काळग्रस्त माणूस भरडला जाईल. आपण महाराष्ट्र सैनिक म्हणून कोणीही पाण्यावाचून वंचित राहता कामा नये याची काळी घ्यावी. जनावरांना चारा आणि दुष्काळाच्या कामांमध्ये सहभाग घ्यावा.''**



### 'एकला चलो'चा नारा...

**सध्याचे राजकीय पक्ष जाती धर्माच्या राजकारणात अडकले असून, आपण लोकहिताचे कामे करत 'एकला चलो'चा नारा द्यावा, अशी भावना मेळाव्यातील वक्त्यांनी व्यक्त केली. राज्यातील दलबदलू राजकारणावर लोकांचा विश्वास उडाला आहे.**

**मनसेकडे ते अपेक्षेने पाहत आहे. त्यामुळे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सर्वसामान्यांची कामे करावी, जनसेवेतूनच मतांचा आशीर्वाद मिळेल, अशी भावनाही कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.**



# पद्म विभूषण शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांच निधन

**पुणे :** ज्येष्ठ शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांचं निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. अखेर आज (शनिवार) हृदय विकाराच्या झटक्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. त्या ९२ वर्षांच्या होत्या. प्रभा अत्रे हे शास्त्रीय संगीत जगतातील अत्यंत प्रसिद्ध नाव आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाची सांगता अत्रे यांच्या गायनाने होत होती. यंदाही त्या गाणार होत्या. मात्र आजारपणामुळे त्या कार्यक्रमाला जाऊ शकल्या नव्हत्या. शास्त्रीय संगीताचा वारसा जपलेल्या महान गायिका म्हणून त्या ओळखल्या जातात. अत्रे यांनी अनेक शिष्ये घडवली आहेत.

अत्रे यांचा जन्म १३ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्यात झाला. त्यांचे वडील दत्तात्रय पिलाजी हे पुण्यातील एका शाळेत मुख्याध्यापक होते. तर आई इंदिरा या शिक्षिका होत्या. गायनातूनच त्यांना छंद म्हणून शास्त्रीय संगीत शिकण्याची प्रेरणा मिळाली. संगीताचं प्रशिक्षण घेत असतानाच अत्रे यांना पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून विज्ञान शाखेत पदवी मिळवली. त्यानंतर लॉ कॉलेजमधून त्यांनी स्नातक पदवी संपादित केली. गणपतराव बोडस, प्रसाद सावकार, मास्टर दामले, भालचंद्र पेंढारकर, राम मराठे, प्रभाकर पणशीकर यांच्यासह नाट्यक्षेत्रात काम केलं होतं. १९५७ मध्ये त्यांच्या पहिल्या 'शारदा' या संगीत नाटकाच्या वेळी देशाचे तत्कातीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचा गौरव केला होता. अत्रे यांनी संगीतातील विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण पुस्तकंदेखील लिहिली आहेत.

# महाराष्ट्र-कर्नाटक भाषावाद चिघळला

## मनसेने कणेरीमठावर फाडले कन्नड भाषेतील फलक, शिवसेनाही आक्रमक

**गोकुळ शिरगाव :** कणेरीमठ, ता. करवीर येथे शेतकरी संमेलनासाठी लावलेले कन्नड भाषेतील फलक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी फाडून जाळले. यानंतर गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, ग्रामस्थ आणि मनसे वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष राजू जाधव यांच्यामध्ये धक्काबुक्की झाली.



महाराष्ट्र आणि कर्नाटकतील शेतकरी बांधवांसाठी कणेरी मठावर शेतकरी मेळावा आयोजित केला आहे. या कार्यक्रमासंदर्भात दिशादर्शक आणि माहिती देणारे फलक जाजल पेट्रोल पंप ते कणेरी मठापर्यंत आणि कणेरी फाटा ते कणेरी मठापर्यंत लावण्यात आले होते. हे फलक कन्नड भाषेत असल्याने मनसेने ते फाडून टाकले.

यावेळी दरम्यान, यांच्यावर ... यावेळी

यापकरणी राजू जाधव, बबन सावरे, आणि सुरेंद्र तिळवेरा यांच्यावर गोकुळ शिरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. दरम्यान, शिवसैनिकांनीही कन्नड सक्ती दूर करण्याची मागणी करीत आक्रमक भूमिका घेत उपनेते संजय पवार व सहसंपर्कप्रमुख विजय देवणे यांच्या नेतृत्वाखाली तावडे हॉटेल, गोकुळ शिरगाव परिसरात लावलेले कन्नड बोर्ड उखडून टाकले. कर्नाटक सरकारच्या आणि कन्नड संघटनांच्या निषेधार्थ जोरदार घोषणा देण्यात आल्या.

'महाराष्ट्र सरकारने कन्नड सक्तीबाबत तातडीने लक्ष घालावे. एवढे सगळे होत असताना महाराष्ट्राचे सीमा समन्वयक मंत्री, मुख्यमंत्री गप्प का बसले आहेत. मराठीवर त्यांचे खरे प्रेम असेल, तर त्यांनी यात तातडीने लक्ष घालावे. महाराष्ट्रातील कन्नड बोर्ड काढण्याचे आदेश सर्व जिल्हा प्रशासनांना, जिल्हाधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी संजय पवार यांनी यावेळी केली आहे.



# बैलगाडी स्पर्धांसाठी परवानगी आता प्रांताधिकारी देणार

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात बैलगाडी स्पर्धांसाठी परवानगी मिळवण्यासाठी आता जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणार नाही, प्रांताधिकारी कार्यालयात जाऊन स्पर्धा आयोजनाची परवानगी आता घेता येणार आहे. जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडी स्पर्धांच्या आयोजनाला अटी आणि शर्तीवर परवानगी दिली आहे. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाने बैलगाडी स्पर्धांच्या आयोजनासाठी मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. या मार्गदर्शन सूचनांचे काटेकोर पालन करणे अभिप्रेत आहे. स्पर्धांच्या आयोजनासाठी आत्तापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करावा लागत होता. यामुळे आयोजकांना अलिबाग येथे येऊन कागदपत्र आणि अर्जांची पुर्तता करावी लागत होती. त्यामुळे आयोजकांची मोठी गैरसोय होत होती. जाचक नियम अटीं मधून सुटका करून घेण्यासाठी बेकायदेशीरपणे स्पर्धा आयोजित करण्याचे प्रमाणही वाढत होते.

ही बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी बैलगाडी स्पर्धांच्या आयोजनाचे अधिकार स्थानिक प्रांताधिकारी यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रांताधिकारी कार्यालयात आता बैलगाडी स्पर्धांच्या आयोजनाची परवानगी मिळू शकणार आहे. आयोजकांना त्यासाठी अलिबाग येथे यावे लागणार नाही बैलगाडी स्पर्धांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होणाऱ्या अर्जांवर सात दिवसांत परवानगी दिली जात होती. पण अर्जदारास विहीत नमुन्यात अर्ज दाखल करणे, कागदपत्रांची पर्तता करणे, परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे, संबधित विभागांचे अहवाल प्राप्त करून घेणे यास बराच वेळ लागत होता. त्यामुळे उपविभागीय अधिकारी कार्यालयांकडे यासंदर्भातील अधिकार देण्याचे निश्चित करण्यात आले.

# देशातील पहिले 'इंटरनॅशनल डार्क स्काय पार्क' महाराष्ट्रात

**नागपूर :** महाराष्ट्रातल्या पेंच व्याघ्र प्रकल्पाला 'इंटरनॅशनल डार्क स्काय पार्क' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी तारे पाहण्याचा आनंद मिळवण्यासाठी मानवी वस्तीपासून दूर जावे लागू नये आणि आकाश निरीक्षणासाठी राखीव जागा आणि उद्याने तयार व्हावी यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर 'इंटरनॅशनल डार्क स्काय असोसिएशन' ची स्थापना करण्यात आली. याच संस्थेने पेंच व्याघ्र प्रकल्पाला भारतातील पहिले 'डार्क स्काय पार्क' होण्याचा मान दिला.



## खगोलप्रेमींसाठी ठरणार खास पर्वणी

पेंच व्याघ्र प्रकल्पाकडून गेल्या काही वर्षात रात्रीच्या आकाशाचे सौंदर्य जपण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे 'इंटरनॅशनल डार्क स्काय असोसिएशन'ने ही मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता व्याघ्र प्रकल्पातील काही भागांमध्ये कृत्रिम प्रकाशामुळे होणारे प्रदूषण नियंत्रित करून आकाश न्याहाळणाऱ्यांसाठी पोषक वातावरण तयार करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. डार्क स्काय पार्क म्हणजे असे क्षेत्र आहे, जिथे फक्त नैसर्गिक प्रकाश असेल, कृत्रिम प्रकाशाचा अभाव असेल आणि त्या ठिकाणची हवा प्रदूषणमुक्त असेल. ज्यामुळे आकाश सहज न्याहाळता येईल. यात कोणताही बदल होऊ नये यासाठी या भागात प्रयत्न केले जातील. असा परिसर आकाश निरिक्षणसाठी उत्तम म्हणून जाहीर केला जातो आणि त्याच भागाला डार्क स्काय पार्क असे म्हणतात.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील 'डार्क स्काय पार्क' हा आशियातला पाचवा प्रकल्प असून याआधी आशिया खंडात जपान आणि दक्षिण कोरियामध्ये असे प्रकल्प उभारण्यात आलेले आहेत. 'इंटरनॅशनल डार्क स्काय असोसिएशन'ने पेंच व्याघ्र प्रकल्पाला दिलेल्या मान्यतेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर या व्याघ्र प्रकल्पाचे नाव कोरले जाणार आहे. 'डार्क स्काय पार्क'ची परवानगी मिळाल्यामुळे जिल्हा नियोजन समितीकडून पेंच व्याघ्र प्रकल्पात रात्रीच्या वेळी आकाशाचे निरीक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र वेधशाळा उभारण्यासाठी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. यासोबतच प्रकाशाचं प्रदूषण कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातील. तसेच या डार्क स्काय प्रकल्पाबाबत स्थानिकांना माहिती दिली जाईल. सोबतच याबाबत प्रशिक्षणही दिले जाणार आहे. या व्याघ्र प्रकल्पातल्या सिलारी बफर झोन पासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या वाघोलीमध्ये आणखीन एक दुर्बीण बसवली जाईल. स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने पवनी बफर क्षेत्राच्या आजूबाजूच्या गावांमध्ये शंभरहून अधिक पथदिवे आणि सामुदायिक दिवे जमिनीकडे तोंड करून लावण्यात आलेले आहेत. त्यांची दिशा बदलण्यात आली आहे. यामुळे प्रकाश प्रदूषण कमी होतं आणि निशाचर परिसंस्थेला कमीत कमी व्यत्यय येतो, असे व्याघ्रप्रकल्पाचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ल यांनी सांगितले.

# खरगेंची 'इंडिया'च्या अध्यक्षपदी नियुक्ती : भाजपसाठी डोकेदुखी

**मुंबई :** काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची विरोधकांच्या 'इंडिया' महाआघाडीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. 'इंडिया'तील नेत्यांच्या शनिवारी झालेल्या आभासी बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मोदींविरोधात खरगे हेच विरोधकांचे पंतप्रधान पदाचा चेहरा असतील! 'इंडिया'ने मोदींविरोधात दलित नेतृत्व उभे करून भाजपच्या ओबीसी राजकारणालाही शह दिल्याचे मानले जात आहे.



गेल्या महिन्यामध्ये दिल्लीत झालेल्या 'इंडिया'च्या बैठकीमध्ये तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी महाआघाडीच्या अध्यक्षपदासाठी खरगेंच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता. या प्रस्तावावर काँग्रेसने अधिकृतपणे कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. त्यामुळे खरगेंना काँग्रेस अंतर्गत विरोध असल्याचा प्रचार भाजपने केला होता. आता खरगेंच्या नियुक्तीमुळे भाजपच्या या अपप्रचारालाही खीळ बसली आहे. खरगे यांच्याकडे 'इंडिया'चे अध्यक्षपद दिले जाऊ शकते व त्यांना पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणूनही मोदींविरोधात उभे केले जाऊ शकते, या दोन्ही मुद्द्यांवर काँग्रेस अंतर्गत आधीच चर्चा झालेली होती. खरगेंच्या नावाला सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी पाठिंबा दिला होता. त्यामुळे खरगेंच्या नावाबाबत काँग्रेसच्या नेतृत्वामध्ये मतभेद नव्हते. 'इंडिया'च्या बैठकीमध्ये सहमतीने खरगेंची अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यामुळे हा कथित वाद संपुष्टात आला आहे.

खरगेंचा प्रदीर्घ राजकीय अनुभव, ज्येष्ठता आणि परिपक्वता हे तीनही घटक 'इंडिया' महाआघाडीतील समरसता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतील. 'इंडिया'च्या घटक पक्षांतील नेत्यांच्या आत्तापर्यंत चार बैठका झाल्या असल्या तरी, त्यांच्यातील ऐक्यापेक्षा मतभेदांवर अधिक चर्चा झाली होती. खरगेंच्या नियुक्तीमुळे 'इंडिया'तील नेत्यांना एकमेकांशी समन्वय साधणे अधिक सुकर होऊ शकेल. काँग्रेस व अन्य घटक पक्षांमध्ये जागावाटपाचा प्रश्न सुटलेला नाही.

# सौंदर्य आणि सातत्य

'फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!'.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार. ते ज्या 'जिंकणाऱ्या' जर्मनांबद्दल बोलले, त्या जर्मनांमध्ये जिंकण्याची मानसिकता रुजवली फ्रान्झ बेकेनबाउर यांनी. १९६०चा उत्तरार्ध आणि १९७०चे दशक बेकेनबाउर यांच्या जर्मनीने गाजवले. फुटबॉल मेरुमणी ब्राझीलचे पेले अस्ताला गेल्यानंतर आणि योहान क्रायुफ यांच्या नेतृत्वाखाली डच फुटबॉल संघ अफलातून कामगिरी करत असताना, स्वत:चे झळाळते अस्तित्व सादर करत, या मातब्बर मंडळींना काही काळ निस्तेज करण्याची कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली. ब्राझिलियन फुटबॉल रसिकांनी फुटबॉलचे वर्णन 'जोगो बोनितो' असे केले आहे. म्हणजे सुंदर खेळ. फुटबॉलमधील ब्राझीलच्या अढळपदामुळे हेच नाव आणि वर्णन सार्वत्रिक ठरले. सौंदर्यामुळेच खेळाच्या लोकप्रियतेची व्याप्ती पंचखंडात पोहोचली. फुटबॉल म्हणजे कौशल्य आणि ऊर्जा यांचा मेळ. यांत समतोल साधून दिग्विजयी होणे हे फुटबॉल संघांचे लक्ष्य असते. पण हे झाले या खेळाचे सरधोपट आणि स्वप्नाळू वर्णन. निव्वळ कौशल्य आणि ऊर्जेच्या पलीकडे या खेळात सखोल व्यामिश्रता असते. मैदानावर खेळताना त्रिमितीय अवकाशभान असावे लागते. संधी हेरण्याची नजर असावी लागते. धोकादायक प्रतिस्पर्ध्यासमोर पाय रोवून उभे राहण्याचा निर्धार लागतो. कोलाहली प्रेक्षकांसमोर धैर्य शाबूत ठेवण्याची कला लागते. त्याहीपलीकडे जाऊन, विविध व्यक्तिमत्त्वांना समान उद्दिष्ट साधण्यासाठी एकाच धाग्यात गुंफावे लागते. यासाठी ठायी नेतृत्व लागते. निष्णातांहून निष्णात गणल्या गेलेल्या फुटबॉलपटूंमध्ये असे बहुपैलुत्व नव्हते. ते ज्या मोजक्यांत होते, त्यांमध्ये बेकेनबाउर हे नाव पहिल्या तिघांत तरी घ्यावेच लागेल.

जर्मन इंजिनीअरिंगची बिनचूक शिस्त आणि इटालियन डिझाइनची नजरखेचक नजाकत अशा मिलाफातून कुणी एखादी मोटार बनवली, तर तिचे नाव 'बेकेनबाउर' असे खुशाल ठेवावे! 'प्रशियन' कण्याच्या उंच चणीचे शरीर, शहामृगासारखी लांब ढांगांची लयबद्ध धाव, गरुडासारखी भिरभिरणारी बहुकोनीय नजर, ग्रीक देवतेसम देखणे व्यक्तिमत्त्व लाभलेले बेकेनबाउर जर्मनांच्या दृष्टीतून सम्राट होते. म्हणूनच 'डेर कायझेर' हा सम्राटासाठीचा जर्मन प्रतिशब्द हीच त्यांची ओळख बनली.

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये जर्मनी आणि क्लब फुटबॉलच्या विश्वात बायर्न म्युनिच यांचा दरारा सत्तरच्या दशकात निर्माण झाला आणि पुढे कित्येक वर्षे टिकून राहिला याचे श्रेय बेकेनबाउर यांना द्यावे लागेल. १९६६ च्या विश्वचषकापासूनच बेकेनबाउर हे नाव विश्वचषकाच्या दुनियेत गाजू लागले होते. तत्कालीन पश्चिम जर्मनीचा संघ अंतिम फेरीत यजमान इंग्लंडला भिडला, त्या वेळी वीस वर्षीय बेकेनबाउर यांच्यावर प्रतिस्पर्धी संघातील निष्णात बॉबी चाल्र्टन यांना थोपवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. गंमत म्हणजे चाल्र्टन यांच्यावरही बेकेनबाउर यांना रोखण्याची जबाबदारी होती! कारण मधल्या फळीत बचावात्मक जबाबदारी असूनही बेकेनबाउर कधीही सुसाटत प्रतिस्पर्ध्याच्या गोटात शिरायचे आणि गोल झळकवायचे. पुढे ते बचावपटू बनले. पण फुटबॉल व्यूहरचनेतील 'लिबेरो' ही खास जागा त्यांनी लोकप्रिय केली. बचावपटू असूनही कधीही मैदानात प्रतिस्पर्धी गोलपर्यंत मुसंडी मारून असे लिबेरो प्रतिस्पर्ध्याची मूळ रचनाच विस्कटवू शकतात. मात्र यासाठी त्यांना स्वत:च्या गस्तीचौकटीबाहेर काही काळ पडावे लागते आणि यात विलक्षण जोखीम असते. कारण प्रतिहल्ला झाल्यास, बचावफळीत एक भिडू कमी झालेला असतो. अशा प्रकारच्या व्यूहरचनेमध्ये असीम कौशल्य आणि हिंमत लागते. बेकेनबाउर यांच्यापाशी ती होती. गोल करण्यासाठी लागणारे कसब असूनही बेकेनबाउर त्या फंदात फारसे पडायचे नाहीत. ती जबाबदारी म्युलर, ब्राइटनर असे त्यांचे सहकारी पार पाडायचे. पण म्हणून बेकेनबाउर यांच्याकडून गोल होणारच नाही याची हमी कुणीही देऊ शकत नव्हते. त्यामुळेच ते अतिशय धोकादायक ठरायचे. १९७२ मध्ये युरो अजिंक्यपद आणि १९७४ मध्ये जगज्जेतेपद जर्मनीने मिळवले. १९७४ ते १९७६ अशी सलग तीन वर्षे बायर्न म्युनिचने युरोपियन क्लब अजिंक्यपद पटकावले. हे सर्व करंडक उंचावणारे बेकेनबाउर पहिले कप्तान होते. फुटबॉलमधील वार्षिक 'बॅलाँ डी ओर' हा प्रतिष्ठेचा वैयक्तिक पुरस्कार दोन वेळा पटकावणारे ते एकमेव बचावपटू.

बेकेनबाउर हे आख्यायिका बनले, त्या सुवर्णपटाचा हा झाला पहिला भाग. दुसऱ्या भागाची सुरुवात झाली ऐंशीच्या दशकात. त्या काळात त्यांच्याकडे जर्मन संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली. ते साच्यातले प्रशिक्षक नव्हते. एकदा त्यांच्या खेळाडूंनी रात्रभर पार्टी आणि मद्यमस्ती केली. एकावरही त्यांनी कारवाई करण्याची इच्छादेखील बोलून दाखवली नाही.

त्यांचे खेळाडूंना एकच सांगणे असे - मैदानावर जा नि आनंद लुटा. तो काळ जर्मनीसाठी आव्हानात्मक होता. हा संघ अंतिम फेरीत किंवा त्याच्या आसपास जात होता, पण तेथे जिंकत नव्हता. इटली, ब्राझील हे जुने प्रतिस्पर्धी अधिक सक्षम बनले होतेच. याशिवाय अर्जेटिना, डेन्मार्क आणि मुख्य म्हणजे फ्रान्ससारखे संघ जर्मनीपेक्षा सरस कामगिरी करून दाखवू लागले होते. पण जर्मनीच्या फुटबॉल व्यवस्थेला आणि फुटबॉलपटूंना बेकेनबाउर यांच्याविषयी आदर होता. सत्तरच्या दशकात मैदानावर दाखवलेले नेतृत्व बेकेनबाउर यांनी थोडे फेरफार करून ऐंशीच्या उत्तरार्धात मैदानाबाहेर केले. पहिल्याच प्रयत्नात म्हणजे १९८६ मध्ये त्यांचा संघ अंतिम फेरीत धडकला. तेथे दिएगो मॅराडोनाच्या युवा, चपळ संघासमोर पराभूत झाला. पुढील विश्वचषक स्पर्धेत याच दोन प्रतिस्पर्ध्यामध्ये अंतिम सामना झाला. तो जर्मनीने जिंकला. कारण जिंकण्याची मानसिकता तोपर्यंत बेकेनबाउर यांनी जर्मन संघात मुरवली होती. ते स्वच्छंदी होते. एकाच जागी घरोबा करून त्याचा मठ बनवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. खेळाडू आणि प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिकांतून विश्वचषक जिंकण्याची अलौकिक कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली.

पण अशी कामगिरी करणारे ते पहिले नव्हेत. तो मान जातो ब्राझीलचे मारियो झागालो यांच्याकडे. झागालो हे नाव सुपरिचित ब्राझिलियन फुटबॉलपटूंच्या मांदियाळीतले नव्हे. पेले, गॅरिंचा, सॉक्रेटिस, रोमारियो, रोनाल्डो, रोनाल्डिन्यो, काका, नेमार अशांची नावे जगभर ठाऊक. या रंगमंचावर झागालो हे नेहमीच विंगेत राहिले. तेही बेकेनबाउर यांच्यासारखे बचावपटूच, पण तरीही वेळ पडेल तेव्हा बगलेवरून सुसाटत धावत जायचे. १९५८ आणि १९६२ मधील विश्वविजेत्या ब्राझिलियन संघाकडून ते खेळले. तरी त्यांचे खरे कर्तृत्व दिसून आले, १९७०मधील सर्वोत्तम ब्राझिलियन विश्वविजेत्या संघाचे प्रशिक्षकपद सांभाळताना. नितांतसुंदर आक्रमक चाली रचताना बचावाचे भानही हवे या भूमिकेतून त्यांनी तो संघ बांधला. लोकांसमोर आला तो पेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अलौकिक खेळ. परंतु त्या संघाचे शिल्पकार होते मारियो झागालो. त्यांचे खेळाडूंना सांगणे असे - मनमुराद खेळा आणि त्या खेळाचा आनंद प्रेक्षकांना द्या.

झागालो आणि बेकेनबाउर. विश्वविजेते खेळाडू आणि विश्वविजेते प्रशिक्षक. दोघेही गेल्या काही दिवसांत निवर्तले. या दोघांव्यतिरिक्त अशी सोनेरी दुहेरी कामगिरी करणारे केवळ फ्रान्सचे दिदिए देशांजच आता हयात आहेत. बेकेनबाउर आणि झागालो यांना फुटबॉलमधील सौंदर्याची जाण होती, तसेच सातत्याचे भानही होते. आज ब्राझील आणि जर्मनीकडे फुटबॉलमधील महासत्ता म्हणून कुणीही पाहत नाही. बहुधा सौंदर्य की सातत्य, या गोंधळात दोन्ही फुटबॉल संस्कृतींचे स्वत्व हरपलेले दिसते. दोन्ही व्यवस्था आज काहीशा कुचेष्टेचाच विषय ठरतात. बेकेनबाउर आणि झागालो यांचे निर्गमन हे त्यामुळेच प्रतीकात्मक आणि खंतावणारेही!

## संक्षिप्त

### आज प्रादेशिक परिवहन विभागाचे सातारामध्ये नेत्र शिबिर

**प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांची माहिती**

**सातारा :** प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने टॅक्सीचालक, रिक्षा चालक यांचा दृष्टीदोष कमी करण्याच्या दृष्टीने रस्ते व परिवहन मंत्रालयाच्या वतीने निर्देश देण्यात आले आहेत या निमित्ताने सातारा कार्यालय येथे आज नेत्र तपासणी तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती प्रादेशिक परिवहन विभागाचे मुख्य परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी दिली.

प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने यासंदर्भात प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे या पत्रकार नमूद आहे की महाराष्ट्रामध्ये रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण मोठे असून यामध्ये सदोष दृष्टी ही मुख्य अडचण आहे. ऑटोरिक्षा चालक, ट्रक चालक, कॅब चालक त्यांचे अपघात कमी करण्याच्या दृष्टीने रस्ते व परिवहन मंत्रालयाने विशेष पावले उचलले आहेत. त्या दृष्टीने सातारा परिवहन कार्यालयाला विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहे त्यानुसार सातारा जिल्ह्यातील निरीक्षक चालक तसेच टॅक्सी चालकांनी आपले डोळे तपासून घेण्याच्या दृष्टीने सुचित करण्यात आले आहे आरटीओ कार्यालयाच्या वतीने सातारा येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे सकाळी ११ वाजता आरोग्य तपासणी तसेच नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरामध्ये आरोग्य तपासणीसह सर्व चालकांचे डोळे तपासण्यात येणार आहे ज्यांना दृष्टीदोष आढळून येतील त्यांना त्यांच्या नंबर नुसार तात्काळ चष्मे उपलब्ध करून देण्यात येतील असे सातारा प्रादेशिक परिवहन विभागाने माहिती दिली आहे.

### अस्तित्व लपवल्या प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** स्वत:चे अस्तित्व लपवल्या प्रकरणी एकाविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पोवई नाका ते राजवाडा जाणाऱ्या रस्त्यावर प्रथमेश दिलीप शिंदे रा. पंतांचा गोट, सातारा हा स्वत:चे अस्तित्व लपवून, चेहरा झाकून अपराध करण्याच्या उद्देशाने बसलेला आढळून आला. अधिक तपास पोलीस हवालदार पाटोळे करीत आहेत.

### तिघांना मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** तिघांना मारहाण केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास माझी चप्पल का चोरली, असे म्हणून अमर लक्ष्मण धनवडे रा. आंबेदरे, धनवडेवाडी, ता. सातारा याने तेथीलच शैला लालसिंग धनवडे, त्यांचा मुलगा आदेश आणि त्यांच्या पतीस निरगुडीच्या काठीने मारहाण केली. अधिक तपास पोलीस हवालदार जगताप करीत आहेत.

### सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ११ रोजी दुपारी दोन वाजता सातारा एसटी बस स्थानक येथे बस चालक सतीश साहेबराव माळवे रा. पुसेसावळी, ता. खटाव यांना मारहाण तसेच वाहक दत्तात्रय भरत गुरव रा. वाठार किरोली, ता. कोरेगाव यांना शिवीगाळ केल्याप्रकरणी महेश संजय कोरे (माळी) रा. चितळी, ता. खटाव यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शितोळे करीत आहेत.

### विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा :** विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी चौघांविरोधात भुईंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ऑगस्ट २०२१ ते १५ सप्टेंबर २०२३ दरम्यान अर्चना विकी यादव राहणार गुळुंब तालुका वाई यांचा जातहाट केल्याप्रकरणी विकी सुनील यादव सुनील शामराव यादव वैशाली सुनील यादव शुभम सुनील यादव सर्व राहणार गुळुंब तालुका वाई यांच्या विरोधात भुईंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कोलवडकर करीत आहेत.

# कराडला ११ देशांतील तज्ज्ञ करणार शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**डॉ. सुरेश भोसले, जे. बी. अनिता यांची माहिती : कृष्णा आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन**

**कराड :** येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर सहकारमहर्षी स्वर्गीय जयवंतराव भोसले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १७ ते २१ जानेवारी दरम्यान आंतरराष्ट्रीय कृष्णा कृषी व औद्यागिक महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात सेंद्रीय शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ११ देशांचे तज्ज्ञ उपस्थित राहणार असल्याची माहिती य. मो. कृष्णा कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले व सेंद्रिय शेतीसाठी आंतरराष्ट्रीय सक्षमता केंद्र बेंगळूरूच्या व्यवस्थापिका जे. बी. अनिता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी कृष्णा कृषी परिषदेचे अध्यक्ष गजेंद्र पाटील, संचालक धनंजय पाटील, कृष्णा कारखान्याचे कार्यकारी संचालक राम पाटील, शुअर शॉटचे संदीप गिड्डे उपस्थित होते.

कृष्णा कृषी महोत्सवासाठी सेंद्रीय शेतीसाठी आंतरराष्ट्रीय सक्षमता केंद्र बेंगळूरू (आयसीसीओए) हे नॉलेज पार्टनर असून या केंद्राच्या व्यवस्थापिका जे. बी. अनिता यांनी आज प्रदर्शनाबाबत माहिती दिली. या संस्थेची स्थापना २००४ साली झाली असून देशभर कंपनीचे काम सुरू आहे. सेंद्रीय शेतीचा प्रसार, प्रचार, मार्केटींगची माहिती आपल्या भागातील शेतकऱ्यांना होण्यासाठी ११ देशांचे तज्ज्ञ प्रतिनिधी या प्रदर्शनात भाग घेणार आहेत. सेंद्रीय शेतीसाठी सर्टिफिकेशन महत्वाचे असून निर्यातीसाठी त्याचा मोठा उपयोग होतो. तसेच निर्यातीची माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. आतापर्यंत दुबई, ऑस्टेलिया, इजिप्त, युरोप, आफ्रिका, संयुक्त अरब अमिरात अशा विविध देशांशी संपर्क झाला आहे. आणखी देशांशी संपर्क सुरू आहे.

डॉ. सुरेश भोसले म्हणाले, प्रदर्शनात सेंद्रीय शेतीची माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील वेगळा कक्ष असणार आहे. तसेच परदेशातील तज्ज्ञांशी आपल्या भागातील शेतकऱ्यांना संवाद साधता यावा, यासाठी भाषांतरकार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामाध्यमातून सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन मिळण्यासाठी प्रदर्शनात प्रयत्न करण्यात येणार आहेत. प्रदर्शनात ४०० हून अधिक स्टॉल्स असणार असून ४० स्टॉल शासनाच्या विविध विभागांना राखीव ठेवण्यात आले आहेत. तर ६० स्टॉलवर आधुनिक मशिनरी असणार आहे. १२० स्टॉलवर शेतीच्या अनुषंगाने विविध माहिती असणार आहे. शनिवारी (उद्या) स्टेडियमवर स्टॉल उभारणीच्या कामाचे भूमिपूजन होणार आहे.

एकमेका साहाय्य करू....

अ‍ॅड. उदयसिंह पाटील-उंडाळकर आणि डॉ. अतुल भोसले यांचे गट राजकारणात एकमेकांच्या विरोधी गट म्हणून ओळखले जातात. दोन्हीकडे एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक आहेत. मात्र काही दिवसापूर्वी रयत साखर कारखान्यात महत्वाची यांत्रिक मोटार नादुरुस्त झाली होती. त्यामुळे गाळप ठप्प होण्याची स्थिती असतानाच ऐनवेळी य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याना 'रयत'च्या मदतीला धावला होता. कृष्णाकडून शिल्लक असलेली मोटार रयतला तातडीने देण्यात आली होती. हे कसे काय झाले? या प्रश्नावर बोलताना कृष्णाचे चेअरमन डॉक्टर सुरेश भोसले म्हणाले, कृष्णा हा सहकारातील राज्यातील पहिला साखर कारखाना आहे.

जुना आहे. त्यामुळे कारखान्यात कशा अडचणी येऊ शकतात हे आम्हाला माहिती आहे. पूर्वानुभव असल्याने आपल्या कृष्णा कारखान्याने आजपर्यंत अनेकवेळा अनेक साखर कारखान्यांना वेगवेगळ्या स्वरूपाची मदत केली आहे. रयतलाही याच पद्धतीने कृष्णाने मदत केली. यामागे एकमेका साह्य करू.. हे सहकारातील ब्रीद आहे. हाच सहकार आहे. प्रत्येक वेळी राजकारण म्हणून त्याकडे बघून चालणार नाही., अशी भूमिका डॉ. सुरेश भोसले यांनी मांडली.

# खासदार श्रीनिवास पाटील यांच्या पत्नीचे निधन



**कराड :** साताराचे खासदार श्रीनिवास पाटील यांच्या पत्नी व सारंग पाटील यांच्या मातोश्री सौ.रजनीदेवी श्रीनिवास पाटील (वय ७६) यांचे शुक्रवार दि.१२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

सौ. रजनीदेवी पाटील या गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या. सध्या त्यांच्यावर पुणे येथे उपचार सुरू होते. आज दुपारी त्यांची प्रकृती गंभीर बनली होती. दुपारी १:३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सौ.रजनीदेवी पाटील यांचा २६ जुलै १९४८ रोजी जन्म झाला. त्यांचे मूळ गाव सातारा तालुक्यातील चिंचणेर वंदन येथील असून चार पिढ्यांची सैनिकी परंपरा असलेल्या बर्गे कुटूंबातील आहे. १६ मे १९६८ रोजी त्यांचा खा.श्रीनिवास पाटील यांच्याशी विवाह झाला. खा. श्रीनिवास पाटील यांच्या प्रशासकीय, राजकिय व सामाजिक जीवनात त्यांनी कायम सोबत दिली. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी सहा वाजता कराड येथील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### प्रोत्साहन देणाऱ्या 'माई'

**खासदार श्रीनिवास पाटील यांच्या प्रत्येक कार्यामध्ये अतिशय हिरीरीने भाग घेऊन त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या सौ.पाटील यांना सर्वजण 'माई' या नावाने ओळखत असत. आदर्श संस्कारित आणि एक धार्मिक गृहिणी म्हणून त्यांची ओळख होती. त्या उच्चशिक्षित असून देखील जुन्या रूढी परंपरा, संस्कृती जपण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. अत्यंत प्रेमळ स्वभाव आणि घरामध्ये येणाऱ्या प्रत्येकाशी त्या अत्यंत आपुलकीने वागत असत. गेले काही दिवस त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. आज दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे.**



# खंडित वीजपुरवठ्यामुळे पांढरवाडीच्या खरात वस्तीवरील नागरिक हैराण

**वीजपुरवठा सुरळीत करण्याची महिला अधिकार परिषदेची मागणी**

**दहिवडी, :** पांढरवाडी ता. माण येथील खरात वस्तीवर सतत खंडित होणाऱ्या विजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले असून वीजपुरवठा नियमित करावा अशा मागणीचे निवेदन महिला अधिकार परिषदेच्यावतीने दहिवडीच्या वीज वितरणच्या कार्यालयातील शाखा अभियंता कदम यांना देणेत आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, खरात वस्ती येथे २० ते २५ कुटुंब असून सगळ्यांनी घरामध्ये वीज कनेक्शन घेतले आहे व नियमित वीज बिल भरत आहेत, असे असताना वस्तीवरील वीज पुरवठा सतत खंडित होत आहे .कधी कधी तर दोन दोन दिवस वीज जाते.विजेवर चालणारी घरगुती उपकरणे महिला वर्गांन चालवता येत नाहीत. अंधारामुळे अनेकवेळा विंचू ,साप चावण्याचे प्रकार घडले आहेत परंतु सुदैवाने जीवितहानी झाली नाही, पण पुढे होणार नाही याची हमी देता येत नाही त्यामुळे वीजपुरवठा नियमित करावा,अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर महिला अधिकार परिषदेच्या अध्यक्षा भारती पवार, कल्पना खरात, पुष्पा भुजबळ, राणी अवघडे, वंदना कुंभार, वैशाली चव्हाण, सारिका गायकवाड, छाया पांढरे, मनीषा जाधव, सुषमा खरात, मालन खरात, नंदा खरात कलावती खरात आदी महिलांच्या सह्या आहेत.

# गांधी मैदानावरून महायुती फुंकणार लोकसभेचे रणशिंग

**सातारा :** लोकसभा निवडणुका काही महिन्यावर येऊन पोहोचल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महायुतीने गांधी मैदानावर लोकसभेचे रणशिंग फुंकण्याची तयारी केली आहे. येत्या १४ जानेवारी रोजी सायंकाळी चार वाजता महायुतीच्या कार्यकर्त्यांचा पहिला मेळावा गांधी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या तयारीची माहिती येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीनंतर देण्यात आली.

या बैठकीस पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले, माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे, आमदार दीपक चव्हाण, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन काका पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम जाधव,अजित दादा पवार राष्ट्रवादी गटाचे जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, डॉ. दिलीप येळगावकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अशोकराव गायकवाड, रयत क्रांती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे इत्यादी यावेळी उपस्थित होते.

गांधी मैदानावर महामेळावा घेऊन लोकसभेची वातावरण निर्मिती करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला पालकमंत्र्यांनी संबोधित केले. गांधी मैदानावर या मेळाव्यासाठी किमान पाच हजार कार्यकर्ते उपस्थित राहतील असा अंदाज आहे. कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने या मेळाव्यास चार वाजता उपस्थित राहतील असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.

# साताऱ्याजवळ रोड रॉबरीचा कट पोलिसांनी उधळला

**स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत शस्त्रासह पाच जण ताब्यात**

**सातारा :** खिंडवाडी परिसरात महामार्गावर लूटमार करण्याच्या हेतूने आलेल्या पाच जणांचा कट स्थानिक गुन्हे शाखेने उधळून लावत त्यांच्याकडून पिस्तुलांसह तीन लाख तीन हजार रूपयांचा इतर मुद्देमाल ताब्यात घेतला. संशयित हे महामार्ग परिसरातील च असल्याने सातारा पोलिसांनी रात्र गस्त वाढविली आहे.

या कारवाईत दोन पिस्टल, चार जिवंत काडतुसे, सुरे, मोबाईल असा मुद्देमाल मोठ्या शिताफीने हस्तगत केला. संशयित अमिर सलीम शेख ,अमिर इम्तीयाज मुजावर,अलिम नजीर शेख, यश सुभाष साळूंखे, अभिषेक उर्फ अबू राजू भिसे या पाच संशयीताना अटक करून त्यांच्या विरुद्ध सातारा शहर पोलीस ठाणेत गुन्हा नोंद केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या पथकाने प्रतिबंधात्मक कारवाईने मोठा अनर्थ टळला असून याबाबद्दल पोलीस अधीक्षक समीर शेख,अपर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व टीमचे अभिनंदन केले.




मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# कल्पकतेच्या हाती 'एमएसआरडीसी'ची सूत्रं

## अनिलकुमार बी. गायकवाड यांच्याकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पदभार

अन्याय झाला, म्हणून रडत बसायचं नाही, अन्यायावर मात करीत उत्तुंग झेप घ्यायची, ही उपजत वृत्ती अनिलकुमार बी. गायकवाड यांच्यात आहे. राज्य सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंळाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती झाली आहे. विकासाच्या धमन्याचा प्रमुख कल्पक, प्रामाणिक आणि गुणवत्तेचा रत्नपारखी असेल, तर विकासाची गती वाढते. आता हेच अनिलकुमारांच्या काळात पाहायला मिळेल, याची खात्री आहे. ज्या पदानं हुलकावणी दिली, ज्यावरून टीका झाली बाजूला व्हावं लागलं, तरी नाउमेद न होता प्रामाणिकपणे काम केलं, तर अन्याय करणाऱ्याला उपरती होते, असंच काहीसं अनिलकुमार बी. गायकवाड यांच्या बाबतीत झाली. दुसऱ्यांच्या चुकीची शिक्षा झाली, तरी त्याबाबत वाईट वाटून न घेता ध्येयाशी आणि कामाशी प्रामाणिकपणा ठेवला तर अन्यायाचं रुपांतर न्यायात होतं, याचा अनुभव अनिलकुमार बी. गायकवाड यांना आला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी राधेशाम मोपलवार पाच वर्षे होते. त्यांच्या बाबतीत अनेक वादविवाद होते. कोणतंही सरकार आलं, तरी त्यांचं पद कायम होतं. आता मात्र त्यांची उचबांगडी झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या पदावर माजी सचिव आणि महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांची नियुक्ती केली आहे. खरंतर निवृत्तीनंतर समाजकारण करायचं असं अनिलकुमार यांनी ठरवलं होतं. त्यांनी वाढदिवसाच्या दिवसाच्या दिवशी त्यांनी तसं सूतोवाच केलं होतं. कितीही कठीण प्रसंग असला, तरी लीलया त्यातून मार्ग काढण्याची आणि कुणालाही विन्मुख न होता परत पाठवण्याची कला अनिलकुमार यांना अवगत आहे. त्यांच्या कामाची पद्धत पाहून आता सरकारनं त्यांना एक वर्षे 'एमएसआरडीसी' च्या व्यवस्थापकीय संचालकपद दिलं आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यात सचिवपदी सनदी अधिकाऱ्यांच्या जोडीला स्थापत्य शास्त्राचं तांत्रिक ज्ञान असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची स्वागतार्ह प्रथा सुशीकुमार शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना सुरू केली. अनिलकुमार यांची नवी नियुक्ती म्हणजे सुशीलकुमार शिंदे यांची दृष्टी आणि धोरणाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बूज राखली असंच म्हणावं लागेल.









सार्वजनिक बांधकाम सचिव या पदावरून दोन वर्षांपूर्वी निवृत्त झाल्यानंतर गायकवाड राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. आता ते व्यवस्थापकीय संचालक सर्वोच्च या पदावर आरुढ झाले आहेत. गायकवाड हे सार्वजनिक बांधकाम आणि रस्ते विकास महामंडळाच्या अनेक प्रकल्पाच्या यशस्वी उभारणीतील नेत्रदीपक कामगिरीमुळं 'विक्रमादित्य' ठरले आहेत. 'सर्वोच्च गुणवत्ता धारक' बनून सार्वजनिक बांधकाम खात्यात सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून पदार्पण केलेला हा अधिकारी आपल्या कर्तृत्वामुळं सर्वोच्च पदावर पोचले आहेत. चार दशकांहून अधिक काळाची कारकीर्द असलेल्या गायकवाड यांच्यात प्रचंड ऊर्जा आणि अफाट कार्यक्षमता आहे. रस्ते, इमारती आणि राज्य रस्ते विकास महामंडळ या तीनही विभागाचं सचिवपद त्यांनी एकाचवेळी समर्थपणे पेललं आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात यापूर्वी असं घडल्याचं उदाहरण नाही.

राज्य रस्ते विकास महामंडळाचे नवे बॉस म्हणून सूत्रं हाती घेतलेल्या गायकवाड यांचा प्रशंसनीय कामगिरीबद्दल राज्य सरकारनं 'उत्कृष्ट अभियंता' पुरस्कार देऊन दोनदा राज्यपालांच्या हस्ते गौरव केलेला आहे. स्थापत्यकला क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरीबद्दल गायकवाड यांना राजस्थानच्या पिलानी येथील श्रीधर युनिव्हर्सिटीनं मानद डॉक्टरेट ही पदवी देऊन सन्मानित केलेलं आहे. मुंबईतील अनेक उड्डाणपूल, मुंबई फोर्ट येथील सार्वजनिक बांधकाम भवन, नवी दिल्लीतील दिमाखदार असं महाराष्ट्र सदन, आगीनंतर मंत्रालयाचे करण्यात आलेलं आकर्षक मेकओव्हर, मोखाडा येथील वैतरणा प्रकल्पात २७६ फुटावर बांधलेला आव्हानात्मक पूल असे अनेक प्रकल्प गायकवाड यांच्या कल्पकतेची साक्ष आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मुंबई-पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक रोड, वांद्रे-वर्सोवा सी लिंक रोड, कोस्टल रोड अशा महत्त्वाच्या प्रकल्पांनी आकार घेतला आहे. विशेष म्हणजे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग या प्रकल्पाची जबाबदारीसुद्धा रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांच्यासोबत गायकवाड यांच्या खांद्यावर होती. त्याचबरोबर लवकरच सुरू होणारा पुण्यातील हजारो कोटींचा रिंग रोड हा प्रकल्पही गायकवाड यांच्याच अभियांत्रिकी प्रतिभेचंच अपत्य आहे. या प्रकल्पासाठीची भूसंपादन प्रक्रिया आता पूर्णत्वास आली आहे. त्यामुळं रिंग रोडचा प्रकल्पही त्यांच्याच नेतृत्वाखाली सुरू होऊन यशस्वीपणे पूर्णत्वास जाईल, यात शंका नाही. गायकवाड यांचं उमदं, उत्साही व्यक्तिमत्त्व आणि अफाट कार्यक्षमता ही तरुणांनाही चकित करणारी आहे. रस्ते हे विकासाची धमनी असतात. देशाच्या विकासात अत्यंत मैलाचा दगड ठरणारा समृद्धी महामार्ग त्यांच्याच मूर्त स्वरुपात येत आहे. अभियांत्रिकीची पदवी घेऊन आपल्या कौशल्याच्या आणि विकासाचा दृष्टिकोन असल्यानं या क्षेत्रातील त्यांचं उल्लेखनीय तसंच समर्पित योगदान आणि यश ठळकपणे उठून दिसते. नुसतं पद मिळालं म्हणजे व्यक्तीची गुणवत्ता सिद्ध होत नाही, तर त्यासाठी कर्तव्यात सर्वकौशल्य ओतून कार्य करायचं असतं. त्यामुळे चिरकाल ठसा उमटतो. अशी कामगिरी करणाऱ्या मोजक्या लोकांच्या रांगेत अनिलकुमार गायकवाड आहेत. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं बांधकाम, इंदू मिलचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, हाय माऊंट बिल्डिंगचं आधुनिकीकरण यात त्यांच्या तांत्रिक कौशल्यानं अभियांत्रिकी क्षेत्रात अमिट छाप सोडली आहे. कमी कालावधीत प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्याची किमया आणि बांधकामाच्या प्रमुख तांत्रिक बाबींकडं लक्ष यामुळे आधुनिक अभियंत्रिकी पदवीधरांसाठी ते दीपस्तंभ आहेत. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात त्यांच्या रुपानं तांत्रिक ज्ञानाचं विद्यापीठच नवअभियंत्यांसाठी उपलब्ध झालं आहे.

**अरुणकुमार एस. मुंदडा**
**ज्येष्ठ पत्रकार**

गायकवाड यांच्यावर जसजशी जबाबदारी वाढत गेली, तसतशी त्यांच्यात कामातील प्रगल्भताही वाढत गेली. उपेक्षित समाजातून येऊन मोठ्या झालेल्या व्यक्ती नंतर समाजाला विसरतात. गायकवाड त्याला अपवाद आहेत. दातृत्त्वाचं दुसरं नाव म्हणजे अनिलकुमार गायकवाड. फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव आहे. गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि वक्तशीरपणा हे त्यांच्या यशस्वीतेचं त्रिसूत्र. त्यांच्या बुद्धिमत्तेचं एक उदाहरण त्यांच्या अधिकारी काळातील सांगितलं जातं. अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण चालू असताना अनिलकुमार गायकवाड यांच्या ते लक्षात आलं. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पष्टपणे तसं सांगितलं. अन्य अधिकारी आश्चर्यचकित झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लगेच मी चुकीचं शिकवत होतो, तर बरोबर काय ते तुम्हीच शिकवा, असं आव्हान दिलं. हे आव्हान अनिलकुमार यांनी लगेच स्वीकारलं आणि बरोबर काय आहे, हे दाखवून दिलं. शिकल्याचा आणि शिकवण्याचा इतका आत्मविश्वास त्यांच्या जवळ होता. त्यांच्या कुशाग्र बुद्धीचं दुसरं उदाहरण म्हणजे अवघ्या तेराव्या वर्षी ते डिप्लोमाच्या पहिल्या वर्षात होते! शाळेत प्रवेश घेण्याअगोदर त्यांना सर्व लिहिता वाचता येत होतं, हे ऐकून कुणालाही आश्चर्य वाटेल; परंतु ती वस्तुस्थिती होती.

अनिलकुमार हे कायम माणसं जोडण्यात धन्यता मानणारे. आलेला माणूस काही तरी घेऊन जाणारच इतकी त्यांची आतिथ्यशिलता. त्यांच्याकडं काम मागायला येणाराही कधी विन्मुख होऊन जाणार नाही, हे त्यांनी आयुष्यभर जपलं. अधिकारी, ठेकेदार, राजकारणी अशा सर्वांशी सहृदयी संबंध जपणं तसं कठीणच; परंतु हे व्रत अनिलकुमार यांनी लीलया जपलं. बांधकाम खात्यात नोकरी करताना अनेकांच्या रोषाला, नाराजीला सामोरं जावं लागतं; परंतु अनिलकुमार यांनी रस्ते या विकासाच्या धमन्या आहेत, त्या चांगल्या झाल्या पाहिजेत, यावर भर दिला. त्यांच्या कल्पकतेचा प्रत्यय अनेक ठिकाणी आला. एका रस्त्याचं काम अनेकदा प्रयत्न करूनही होत नव्हतं. तिथला शेतकरी प्रत्येक अधिकाऱ्याला पिटाळून लावत होता. अनिलकुमार त्यांना भेटले. त्यांची अडचण समजावून घेतली. इतका हा शेतकरी जीवावर का उठला, हे जाणून घेतलं. त्याच्या शेतातून रस्ता जात होता आणि विहीरही त्यात जात होती. त्याचं सारं आयुष्य पणाला लागलं होतं. अनिलकुमार यांनी रस्ता तर तयार केलाच, शिवाय त्या शेतकऱ्याला आयुष्यभराचं उत्पन्नाचं साधन मिळवून दिलं. जिथं पैसा कमी पडेल, तिथं खासगी विकासकांना बरोबर घेऊन मोठमोठी कामं त्यांनी केली. त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा!

## पहिल्या दिवशी सागरी सेतूवरून ८,१६४ वाहनांनी केला प्रवास

**मुंबई :** मुंबई पारबंदर प्रकल्पाचे (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) शुक्रवारी लोकार्पण झाल्यानंतर शनिवारी सकाळी ८ वाजता सागरी सेतू वाहतुकीसाठी खुला झाला. पहिल्या दिवशी (सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) या सागरी सेतूवरून तब्बल ८,१६४ वाहनांनी प्रवास केला. मात्र एमएमआरडीएला पथकराद्वारे किती महसूल मिळाला याची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. शनिवारी सुट्टीचा दिवस असल्याने अनेकांनी सागरी सेतूवरून सफर करण्याचा आनंद लुटला, असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई आणि नवी मुंबई दरम्यानचा प्रवास २० ते २२ मिनिटात करता यावा यासाठी एमएमआरडीएने २१.८० किमी लांबीचा शिवडी - न्हावाशेवा सागरी सेतू बांधला असून या सागरी सेतूसाठी १७ हजार ४०० कोटी (वाढीव खर्च अंदाजे २१ हजार कोटी) खर्च आला. हा खर्च वसूल करण्यासाठी एमएमआरडीएने या सागरी सेतूवरील प्रवासासाठी पथकर लागू केला आहे. शिवडी - गव्हाण (चिर्ले) दरम्यान एकेरी प्रवासासाठी २५० रुपये पथकर भरावा लागणार आहे. तर दुहेरी प्रवासासाठी ३७५ रुपये पथकर भरावा लागणार आहे. पथकर अधिक असल्याचा आक्षेप घेण्यात येत आहे. मुळात पथकर लागत असल्याने प्रवासी, वाहनचालकांकडून भविष्यात कसा प्रतिसाद मिळतो याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, या सागरी सेतूवरून २०२४ मध्ये दिवसाला ३९ हजार ३०० वाहने धावतील, असे एका अहवालानुसार सांगितले जात आहे. तर २०३२ पर्यंत एक लाख ३ हजार वाहने धावतील, असाही दावा केला जात आहे. आता हा दावा कितपत खरा ठरतो हे येणाऱ्या काळात समजेल. पण पहिल्या दिवशी शनिवारी नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार पहिल्या दिवशी ( सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ) ८,१६४ वाहनांनी सागरी सेतूवरून प्रवास केला. यातून एमएमआरडीएला पथकराद्वारे किती महसूल मिळाला याची माहिती २४ तासानंतर उपलब्ध होते. त्यामुळे पहिल्या दिवसाच्या महसुलाची माहिती रविवारी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

## ऊस गाळपात सोलापूर विभाग राज्यात आघाडीवर

**सोलापूर:** कोल्हापूर व पुणे विभागातील गाळपाचा वेग दररोज वाढत असला तरी आज सोलापूर विभाग राज्यात आघाडीवर आहे. मात्र काही दिवसात कोल्हापूर व पुणे विभागातील साखर कारखाने ऊस गाळपात पुढे जाण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्यातील १८ साखर कारखान्यांनी गाळपाचा पाच लाखाचा टप्पा पार केला आहे. सोलापूर विभागाचे गाळप ११३ लाख तर कोल्हापूर व पुणे विभागाचे गाळप १११ लाख मेट्रिक टनापेक्षा अधिक झाले आहे. एकट्या सोलापूर जिल्हाचे गाळप ९० लाख मेट्रिक टन इतके झाले आहे.

राज्यातील साखर कारखान्यांच्या गाळपाने आता वेग घेतला आहे. नोव्हेंबर महिन्यात सुरुवातीला ऊस तोडणी मजुरांमुळे गाळपाला व्यत्यय आला होता मात्र नंतर काही साखर कारखाने वगळता पुरेशा तोडणी यंत्रनेवर साखर कारखाने पुर्ण क्षमतेने सुरू आहेत. यंत्रनेअभावी काही साखर कारखान्याचे गाळप अतिशय मंद गतीने सुरू आहे.



सध्या ऊस गाळपात सोलापूर विभाग राज्यात आघाडीवर आहे. पुणे व कोल्हापूर विभागापेक्षा सोलापूर विभागाचे गाळप अवघ्या एक लाख मेट्रिक टनाने अधिक आहे. मात्र सध्या कोल्हापूर व पुणे विभागातील साखर कारखाने पुर्ण क्षमतेने सुरू आहेत तर सोलापूर जिल्हात ऊस तोडणीसाठी पुरेशी यंत्रना नाही. याचा फटका साखर कारखान्यांना बसत आहे.

**बारामती ग्रो गाळपात प्रथम**

राज्यात बारामती ग्रो. दौंड या साखर कारखान्याचे गाळप सर्वाधिक ११ लाख मेट्रिक टन इतके झाले आहे. त्यानंतर सोलापूर जिल्हातील माढा तालुक्यातील विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याने ९ लाख १० हजार तर यशवंतराव मोहिते कृष्णा रेठरेबुद्रुकचे गाळप ७ लाख ३१ हजार मेट्रिक टन इतके झाले आहे.

## एकाही गावाला पाणी टंचाई भासू देणार नाही : आ.महेश शिंदे

### प्रभावी उपाययोजना करण्याची दिली ग्वाही

**कोरेगाव :** कोरेगाव विधानसभा मतदारसंघात समाविष्ठ असलेल्या एकाही गावाला पाणी टंचाई भासू देणार नाही. राज्य सरकारच्या माध्यमातून प्रभावी उपाययोजना केली जाणार असून, जेथे जेथे आवश्यक आहे, तेथे नव्याने कूपनलिका घेतल्या जातील. पाणी पुरवठा योजनांना अखंडीत वीज पुरवठा व्हावा, यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर्स बसविले जातील, अशी घोषणा आमदार महेश शिंदे यांनी केली.

कोरेगाव औद्योगिक वसाहतीतील प्रियांका मल्टीपर्पज हॉलमध्ये शुक्रवारी दुपारी टंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यात अध्यक्षस्थानावरुन आ. शिंदे बोलत होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील खत्री, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहूल प्रकाश बर्गे, कोरेगाव विकास आघाडीचे अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, माजी नगरसेवक महेश साहेबराव बर्गे, प्रांताधिकारी अभिजित नाईक, तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, पंचायत समितीचे प्रशासक तथा गटविकास अधिकारी किशोर माने, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता उत्तमराव आंधळे, महावितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता दिनेश कडाळे, नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्यासह विविध खात्यांचे प्रमुख अधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक उपस्थित होते.



आ. शिंदे म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची उपलब्धता कमी आहे, त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर होणे आवश्यक असून, गावपातळीवर त्याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला संयुक्तरित्या पाणी टंचाईवर मात करावी लागणार आहे. त्यासाठी सर्वांनी एकोप्याने काम करावे. ज्या गावात नवीन वीज वाहिनी व ट्रान्सफॉर्मर्स बसवायचे आहेत, त्या गावांसाठी मी महावितरण कंपनीचे प्रभारी अधीक्षक अभियंता महेश बारटक्के यांना सूचना दिल्या आहेत. लवकरच सातारच्या मंडल कार्यालयात विशेष बैठक घेऊन विजेचे प्रश्न सोडविले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कोरेगाव शहरात सध्या तीव्र पाणी टंचाई भासत आहे, प्रशासनाने तातडीने टँकरची व्यवस्था करावी, जुन्या कूपनलिकांची पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ दुरुस्ती करुन द्यावी, नवीन कूपनलिका घेण्यासाठी आणि विहीर अधिग्रहण आदी विषयावर तातडीने पावले उचलावीत, अशा सूचना आ. शिंदे यांनी प्रशासकीय अधिकार्यांना दिल्या.

यावेळी आ. शिंदे यांनी गावनिहाय सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवकांकडून पाणी टंचाईचा आढावा घेतला. तातडीने करावयाच्या उपाययोजनांबाबत जागेवरच संबंधित प्रशासकीय अधिकार्यांना निर्देश दिले. जेथे जेथे अडचण आहे, तेथे तेथे बैठक घेऊन मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीच्या यशस्वीतेसाठी प्रांताधिकारी कार्यालयातील अव्वल कारकून रणजित जाधव, मंडल अधिकारी शिवाजीराव पिसाळ, तलाठी किरण पवार, समाजसेवी कर्मचारी संतोष बर्गे, कोतवाल सुरज सरगडे यांनी परिश्रम घेतले.


# तिळाचे लाडू कडक होणार नाही, 'ही' पद्धत अवलंबवा



**कृती :** सर्व प्रथम कढईत तिळ आणि शेंगदाणे वेगवेगळे भाजून घ्यावे. नंतर ते एका ताटात काढून घ्यावे. त्यानंतर कढईत एक चमचा तूप टाकून त्यात गूळ बारीक करून टाका. तसेच गूळ पूर्ण वितळून घ्यावा. बोटाला गूळ चिकटतो आहे का  हे पहा आणि मग नंतर शेंगदाणे, तिळ, वेलची पूड, भाजून घेतलेली चण्याची डाळ  अदि हे सर्व मिश्रण टाकून हलवून घ्यावे.

हे मिश्रण एकजीव झाल्यावर ताटात काढून घ्यावे आणि मग तुम्हाला हवा असेल तशे  आकाराचे लाडू वळण्यास सुरूवात करा. मिश्रण गरम असतानाच लाडू वळले तर पटकन वळले जातात व मऊ देखील होतात.अशा पद्धतीने लाडू केल्यास ते कडक होणार नाही.

# 'इक बगल में चाँद होगा'



तो गाणं म्हणतो.. तो सिनेमाचा आवाज होतो, अभिनय करतो, सिनेमातही आणि नाटकांतही. तो कविताही करतो कारण तो संवेदनशील आहे. बरोबर हे सगळे गुण ज्याच्यात अगदी एकवटले आहेत त्या मनमौजी आणि कलंदर कलाकाराचं नाव आहे पियूष मिश्रा. त्याचे शब्द जादू करतात, थेट काळजात घर करतात. याचं कारण आहे त्याला काळजाला हात कसा घालायचा ते उमगलंय.

पियूष मिश्रा हा कलाकार म्हणजे एक हरहुन्नरी आणि मस्तमौला माणूस आहे.

'वो काम भला क्या काम हुआ?' ही त्याची कविता आजही त्याने ऐकवावी अशी फर्माहीश केली जाते. गायन, लेखन, अभिनय करुन आणि कवितांमुळे घराघरांत पोहचलेल्या पियूषने रंगमंचावर दीर्घकाळ काम केलं. तसंच नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये त्याने अभिनयाचे धडे गिरवले होते. त्यामुळे त्याच्या अभिनयाचं बावनकशी सोनं तावून सुलाखूनच बाहेर पडलं होतं. त्याच्या अभिनयाला जोड लाभली ती त्याच्या संवेदनशील शब्दांची. १९९८ मध्ये आलेल्या 'दिल से', त्यानंतर आलेल्या 'मकबूल'मध्ये पियूषच्या उत्तम अभिनयाचं दर्शन प्रेक्षकांना झालं. 'ओ हुस्ना' ही कविताही त्याच्या उत्तम कवितांपैकी एक आहे. त्याच्या कवितेचं मुख्य वैशिष्ट्य हेदेखील असतं की त्यात त्या काळाचे, राजकीय परिस्थितीचे संदर्भही असतात. त्याची कविता मातीतली आहे. त्यामुळेच ती आपल्याशी थेट संवाद साधते.

गँग्ज ऑफ वासेपूरचं त्याचं नॅरेशन आजही स्मरणात

'ओ री दुनिया..', 'इक बगल में चांद होगा..' ही गाणीही पियूषचीच आहेत. 'गँग्ज ऑफ वासेपूर' या सिनेमाची त्याची गोष्ट सांगण्याची शैली हीदेखील प्रेक्षकांच्या आजही स्मरणात आहे. 'हम मुसलमानोंकी महाभारत आज भी चल रहीं है..', 'इन्सान जो हैं बस तो तरह के होते हैं.. एक होते हैं हरामी और दुसरे बेवकूफ और ये सारा खेल इन दोनोंका ही हैं..' या संवादाने ती सुरुवात होते. त्यानंतर कानात फक्त त्याचाच आवाज घुमत राहतो आणि थेट आपण त्या सिनेमाचा भाग होऊन तो सिनेमा पाहू लागतो. आवाजाची जादू काय? हे पियूष नकळतपणे आपल्याला सांगून जातो.

अभिनेता व्हायचं हे कसं उलडगलं?

एखाद्या चित्रकाराला सांगितलं की चित्र काढ तर तो काढून दाखवतो. एखाद्या गायकाला सांगितलं की गाणं म्हण तर तो म्हणतो. मात्र अभिनेत्याचं तसं नसतं. चित्रकार, गायक किंवा इतर कला सादर करणारे लोक रियाज करतात, अभ्यास करतात. अभिनेता अभ्यास करत नाही. त्याचा अभिनय विशिष्ट परिस्थितीतून येतो. तशी परिस्थिती निर्माण करायची हा अभ्यास अभिनेता करत असतो, असं मत पियूषने मांडलं होतं. रोज आपण अभिनय का करु शकत नाही? अभिनयाचा सराव कसा करायचा? हे प्रश्न मला सतावू लागले आणि त्याची उत्तरं मिळवण्यासाठी मी अभिनय करु लागलो. एनएसडीच्या शिक्षकांनी ते माझ्यात रुजवलं असंही पियूष मिश्राने म्हटलं होतं. 'हॅम्लेट' या नाटकाने मला अमाप प्रसिद्धी दिली. ही प्रसिद्धी डोक्यात हवा जाण्याइतकी होती. असंही तो सांगतो. -र्लीं`पश या संस्थेत जेव्हा आलो त्यानंतर चित्रपटांकडे वळलो असंही पियूष मिश्राने सांगितलं होतं. एन. के. शर्मा आणि पियूष मिश्रा यांची ओळख ॲक्ट

१९९० च्या दशकात सुरुवातीला मुंबईत आलो होतो तेव्हा मला स्ट्रगल कसं करायचं ते पण मला माहीत नव्हतं. ॲक्ट वनच्या आधी जेव्हा मुंबईत ते डोक्यात हवा जाण्याचे दिवसच होते. कारण मला नाटकांनी प्रसिद्धी दिली होती. फोटो काढून प्रोफाईल तयार करा, दिग्दर्शक, निर्मात्यांना भेटा हे मला पटतच नव्हतं. त्यामुळे दिल्लीत परतलो. त्यानंतर ॲक्ट वन या ग्रुपशी जोडला गेलो. असंही पियूषने सांगितलं होतं. 'लिजंड ऑफ भगत सिंग' सिनेमा लिहिण्यासाठी पियूष मुंबईला २००१ मध्ये आला होता. त्यानंतर २००३ पासून तो इथलाच झाला. प्रसिद्धीमुळे माणसात अहंकार येतो. मीही त्याला अपवाद नव्हतो. २००५ पर्यंत मी खूपच अहंकारी होतो असंही पियूषने एका मुलाखतीत सांगितलं होतं. पुढे पियूष म्हणतो, मनोज वाजपेयी, रेखा भारद्वाज, विशाल भारद्वाज हे सगळे माझ्या ग्रुपचे होते. त्यांना सिनेमांतून त्यांची ओळख मिळाली होती. पण मला कुणी ओळखत नाही हे मला माझ्या मनात सतावत होतं. तसंच तो एक काळ होता की जेव्हा मी दारुच्या पूर्ण आहारी गेलो होतो.मात्र विपश्यनेने आयुष्यात खूप बदल घडवले असंही पियूषने सांगितलं होतं.

एक कलाकार म्हणून तो त्याचं आयुष्य खूप उत्तम प्रकारे जगला आहे. कवी म्हणून तो संवेदनशील आहे. त्याचा आवाज हा त्याचा सर्वात मोठा प्लस पॉईंट आहे. 'आरंभ है प्रचंड बोले मस्तको कें

झुंड.. हे

त्याच्या लेखणीतून उतरलेलं आणि त्याच्या आवाजामुळे जिवंत झालेलं अजरामर गाणं आहे. त्याच्या कविता आणि त्याच्या अभिनयांतून तर तो आपल्या समोर येत असतोच. पियूषने 'गँग्ज ऑफ वासेपूर'साठी 'इक बगल में चाँद होगा' ही कविता लिहिली होती. सिनेमातल्या परिस्थितीवर अवलंबून अशा ओळी गीतकरा, कवी असलेल्या माणसाला लिहाव्या लागतात. मात्र ही कविता त्याच्याच आयुष्याचं सार सांगणारी आहे असं वाटतं. तो ज्या अंदाजात हे गाणं गायला आहे ते थेट मनाला भिडतं. माणसं जेव्हा पियूषसारखी मनस्वी असतात, तेव्हा ती अशाच अविर्भावात वावरत असतात. पियूषही 'इक बगलमें चाँद होगा..' याच अंदाजात तो वावरतोय, वावर राहिल यात शंका नाही. अशा हरफन मौला कलावंताला वाढदिवसाच्या शुभेच्छा!

# का विस्मृतीत जातात बालपणीच्या आठवणी?



लहानपणी, त्यातही पाच वर्षांच्या आतली मुले सगळ्या बारीकसारीक गोष्टी बघत असतात. आजूबाजूच्या छोट्या छोट्या गोष्टी निरखून पाहत असतात, आई-बाबा आणि आजूबाजूच्या नेहमीच्या माणसांना ओळख दाखवू लागतात, जागी असताना नको इतकी सक्रिय असतात, अनेक गोष्टी का घडतात याबद्दल जिज्ञासू असतात.

रांगायला लागली की त्यांना सतत रांगायचे असते, उभी राहू लागली की उभे राहायचे असते, चालायला जमले की चालायचे असते; बोलणे, ऐकलेले शब्द बडबडणे, शिकवलेले शब्द म्हणणे याबाबत ती कमालीची मोटिव्हेटेड असतात.

हीच मुले मोठी झाली की मात्र त्यांना आधीचे काही आठवत नाही. अनुभवलेल्या गोष्टी विस्मरणात जातात. त्यांना त्यांचाच पहिला वाढदिवस आठवत नाही, दुसराही आठवत नाही.

उच्चारलेले पहिले शब्द, पहिली पावले, आवडता खाऊ, आई-बाबांसोबत केलेले प्रवास, पाहिलेली वेगवेगळी स्थळे, खूप दिवसात न भेटलेले नातेवाईक... काही काही आठवत नाही.

चाइल्डहुड किंवा इन्फन्टाइल ॲम्नेशिया म्हणजे आयुष्यातील पहिली दोन-तीन वर्षे आठवण्याची असमर्थता, या काळातला स्मरणशक्तीचा अभाव.

या विषयाने १९व्या शतकापासून मानसशास्त्रज्ञांना गोंधळात टाकले आहे. बालपणातील स्मृतिभ्रंश हे कोडेच नव्हे, तर विरोधाभासही आहे. बालपणात घेतलेल्या जीवनाच्या मूलभूत शिक्षणातून मुलांचा नाट्यमयरित्या विकास होत असतो, पण मग स्मरणशक्तीचा अभाव असताना, तो कसा काय होतो? काहीच लक्षातच राहत नसेल, तर चालणे, बोलणे, पलंगावर चढणे, खाली उडी मारणे, कपाटे धुंडाळणे, माणसे ओळखणे ते कसे काय शिकतात?

बालपणातील हा स्मृतिभ्रंश समजून घेण्यासाठी, आपले दृढ समज बदलून या गोष्टींचा वेगळ्या पद्धतीने विचार करणे आवश्यक ठरते.

बालकांच्या सर्वसामान्य विकास प्रक्रियेला 'स्मृतिभ्रंश' असे लेबल लावून त्याचा संबंध एखाद्या आजाराशी जोडण्याऐवजी, आपला दृष्टिकोन बदलून, स्मरणशक्तीचा आरंभ कसा सुरू होतो याचा विचार करायला हवा.

**स्मरणशक्तीचा श्रीगणेशा**

सर्वसाधारणपणे बालकांच्या वैयक्तिक स्मरणशक्तीची पायाभरणी वयाच्या २४ ते ३६ महिन्यांच्या दरम्यान होऊ लागते. स्मरणशक्तीच्या प्रवासाच्या या प्रक्रियेचे सात घटक संशोधकांना लक्षात आले.

विकसनशील मेंदू : माणसाच्या मोठ्या मेंदूच्या बाह्य थराला सेरेब्रल कॉर्टेक्स म्हणतात. त्यात मोठ्या प्रमाणात मज्जापेशी असतात. जन्मल्यानंतर पहिल्या दोन वर्षांमध्ये कॉर्टेक्समध्ये मज्जापेशींची संख्यात्मकवाढ वेगाने होऊन तो परिपक्व होऊ लागतो. या दरम्यान विजेच्या तारांना जसे इन्सुलेशन असते, तसे मायलिनेशन नावाच्या प्रक्रियेद्वारे, मायलिन आवरण म्हणून ओळखला जाणारा विद्युत इन्सुलेशन थर, ॲक्सॉन या शेपटीसारख्या दिसणाऱ्या मज्जापेशींच्या भागावर तयार होतो. या दरम्यान मोठ्या मेंदूतील हिप्पोकॅम्पस नावाच्या एका विभागाद्वारे स्मृतींची निर्मिती आणि मेंदूच्या कॉर्टेक्समध्ये स्मृतींची साठवण सुरू होते.

मज्जापेशी एकमेकांना जोडलेल्या असतात. दोन मज्जापेशी जिथे जोडल्या जातात. त्याला सायनॅप्स म्हणतात. मायलिनेशन प्रक्रियेत कॉर्टेक्स आणि हिप्पोकॅम्पसमधल्या मज्जापेशींची नव्याने जोडणी होते, जुन्या कनेक्शनच्या जागी नवीन जोड येतात. आणि मज्जापेशींची वाढ होताना, प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या कनेक्शनच्या जागी नवे सायनॅप्स तयार होतात. याचा परिणाम जीवनाच्या सुरुवातीच्या आठवणींमध्ये व्यत्यय येण्यात होतो.

लहान मुलांना त्यांचे सुरुवातीचे बालपण आठवते, ते मज्जापेशी पक्व होण्याआधीचे. अडीच वर्षांच्या मुलांना सहा महिन्यांपूर्वीच्या घटना सहजपणे आठवतात, पण त्यानंतर दोन वर्षांनी त्या घटना त्यांना आठवत नाहीत.

लक्षात ठेवण्यास शिकणे : अगदी छोट्या मुलांना गोष्टी लक्षात ठेवण्यात अजिबात रस नसतो. ते फक्त त्यांचे दैनंदिन जीवन जगत असतात. मात्र, सभोवतालच्या मोठ्या लोकांशी संवाद साधताना, हे काय आहे? ते काय आहे? असे विचारत त्यांना गोष्टी लक्षात

ठेवणे शिकवले जाते. पालक जेव्हा काल आपण कोणाकडे गेलो होतो? किंवा काल तुला अमुक तमुकने काय दिले? असे विचारून त्यांच्या आठवणी जाग्या करून देत राहतात, तेव्हा त्या मुलांना जाणीव होते, की लक्षात ठेवणे हे या मोठ्या लोकांसाठी महत्त्वाचे आहे, आणि आपण त्याचा सराव करून ते शिकायला हवे.

बालकांच्या जीवनातील नवनवीन आणि परिणामकारक घटनांकडे त्यांच्या स्मृती आकर्षित होत असतात. आघात, आनंद, रागावणे अशा घटना त्यांना एकप्रकारे धडा शिकवतात. महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आणि सामान्य व दैनंदिन कोणत्या हे अगदी लहानपणी समजतनसते. त्यामुळे जेव्हा लहान मुले नुकत्याच घडलेल्या एखाद्या घटनेचे वर्णन करतात, तेव्हा मोठ्या माणसांच्या दृष्टीने त्या 'किरकोळ', 'जनरल' असतात, फारशा लक्षात ठेवण्याजोग्या नसतात.

# चेहऱ्याचे सौंदर्य वाढवणाऱ्या सोप्या टिप्स

त्वचा नितळ आणि सुंदर दिसण्यासाठी तुम्हाला काही सवयी सोडाव्या लागतील; तर काही नवीन गोष्टींची सवय लावून घ्यावी लागेल.

आपल्या त्वचेवरील मुरुमं, डाग, डोळ्याखालील काळी वर्तुळं किंवा कोरड्या त्वचेसारख्या समस्यांवर तुम्ही चेहऱ्यावर नुसते कुठलेतरी क्रीम, फेसमास्क, फेसपॅक लावत असाल तर, त्यासर्वांचा तात्पुरता उपयोग किंवा परिणाम तुम्हाला नक्कीच जाणवेल. मात्र या गोष्टी वापरणे बंद केल्यावर, त्वचा पुन्हा आधीसारखी होऊ लागते. असे न होण्यासाठी स्किन केअरबरोबर पोषक आहार असणे; आणि आपल्याला चांगल्या सवयी असणे खूप गरजेचे असते.

थकलेल्या चेहऱ्याला पुन्हा, तजेला देण्यासाठी काय टिप्स आहेत ते पाहू.

**सुंदर त्वचेसाठी स्वतःला या १० सवयी लावा :**

**१. त्वचेला हायड्रेटेड ठेवणे**

पाणी पिणे ही सवय आपल्या शरीरासाठी किती महत्वाची आहे, हे सर्वांनाच माहित आहे. त्यामुळे आपल्या त्वचेला तजेला देण्यासाठी, त्याला कोरडे होण्यापासून वाचवण्यासाठी दररोज योग्यप्रमाणात पाणी पिणे अतिशय गरजेचे असते.

**२. त्वचेचा सूर्यकिरणांपासून बचाव करणे**

आपण, सूर्याच्या अतिनील किरणांमुळे आपल्याला त्वचेचे आजार होतात हे जाणून आहोत. त्यामुळे घराबाहेर पडताना, कायम किमान ३० ड्झक्र असणारे सनस्क्रीन आपल्या त्वचेवर लावावे. असे केल्याने सूर्यकिरणांचा आपल्या त्वचेवर फार प्रभाव होत नाही; परिणामी त्वचा काळवंडणे, उन्हाचा त्वचेला होणार त्रास यांसारख्या गोष्टी टाळता येऊ शकतात.

**३. पौष्टिक आहार**

त्वचा उत्तम राहण्यासाठी आपल्या शरीराला आतून पोषण मिळणे गरजेचे असते. त्यामुळे आहारात भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने इत्यादी पोषक घटक असणारे पदार्थ घ्यावे. विविध फळं, भाज्या-पालेभाज्या, डाळी, सुकामेवा; मांसाहार करत असल्यास अंडी, मासे यांसारख्या गोष्टींचा समावेश करा. यामुळे केवळ त्वचेलाच नाही तर तुमच्या संपूर्ण शरीराला उपयोग होईल.

**४. क्लिंझिंग**

दररोज रात्री झोपण्यापूर्वी तुमचा चेहरा स्वच्छ करून करून मगच झोपावे. मेकअप लावला असल्यास तो न चुकता काढून टाकावा. यासाठी तुम्ही सौम्य क्लिंझिंगचा वापर करू शकता.

**५. मॉइश्चरायझर**

त्वचेचे रक्षण करण्यासाठी दररोज, एखाद्या सौम्य मॉइश्चराइजरचा वापर करावा. यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाही आणि त्वचा मऊ राहण्यास मदत होते.

**६. योग्य प्रमाणात झोप घेणे**

शक्यतो ७ ते ८ तासांची झोप घेण्याचा प्रयत्न करा. रात्री आपण झोपलेलो असतो; मात्र आपले शरीर, आपल्या पेशींना पुनरुज्जीवित करण्याचे काम करत असतात. त्यामुळे आपली त्वचा तरुण दिसण्यास मदत होते. म्हणून योग्य प्रमाणात झोप घेणे महत्वाचे असते.

**७. ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा.**

अतिरिक्त ताणाचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्यामुळे योगा, ध्यान किंवा दीर्घ श्वासोत्श्वास करून आलेला ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयन्त करा.

**८. नियमित व्यायाम**

व्यायाम केल्याने आपल्या संपूर्ण शरीरात रक्तपुरवठा व्यवस्थित/सुरळीतपणे होण्यास मदत होते. ज्याचा फायदा आपल्या सर्व अवयवांना तर होतोच, त्याचबरोबर त्वचा सुंदर दिसण्यासाठीही हे महत्वाचे काम करतो. त्यामुळे आपले आरोग्य आणि त्वचेचे सौंदर्य जपण्यासाठी नियमित व्यायाम करण्याचा प्रयत्न करावा.

**९. धूम्रपान करणे टाळावे**

धूम्रपान करण्यामुळे आरोग्याला हानी पोहोचते. तसेच याचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्वचा सैल पडणे, चेहऱ्यावर सुरकुत्या येणे यासारख्या समस्या धूम्रपान केल्याने उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी धूम्रपान करू नये. अशी माहिती टाइम्स ऑफ इंडियाच्या एका लेखातून समजते.

**१०. मद्यपानाचे सेवन**

अति मद्यपान केल्याने त्याचा परिणाम आपल्या त्वचेवरदेखील होतो. त्वचा डिहायड्रेट म्हणजेच कोरडी पडून, त्यावर सुरकुत्या येऊ शकतात. तसेच चेहऱ्यावर तुमचे वय दिसू लागते. असे होऊ नये यासाठी, आपले आरोग्य जपण्यासाठी मद्यपानाचे मर्यादित प्रमाणात सेवन करावे. शक्य असल्यास मद्यपान करणे टाळावे.





# ६ चौकार अन् ४ षटकार....!

## अर्जुन तेंडुलकरचा कहर पण थोडक्यात हुकल शतक

दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर सध्या रणजी ट्रॉफीमध्ये गोव्यासाठी धुमाकूळ घालत आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्जुनने चंदीगडविरुद्ध स्फोटक खेळी खेळली. त्याचे शतक हुकले असले तरी त्याने ज्याप्रकारे धडाकेबाज फलंदाजी केली, त्यामुळे सगळेच प्रभावित झाले. अर्जुन हा डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज आहे आणि खालच्या फळीत त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याने या सामन्यात ११६.६७ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या.

# हिवाळ्यात अंजीर का खावे?



अंजीर जेवढे चविला छान असते, तितकेच ते आरोग्याच्या दृष्टीने चांगले असते.

१. अंजीरमध्ये चांगल्या प्रमाणात डायट फायबर असतात. हे पचन संस्थेला ठीक करते. यामुळे पोट पण साफ होते. यासाठी रात्री दोन ते अंजीर पाण्यात भिजुन ठेवा आणि सकाळी उठल्यावर ते खा. याने कब्ज, एसिडिटी, गॅस, मुळव्याध तसेच ब्लोटिंगची समस्या दूर होते साधारण कब्जच्या अवस्थेत गरम दुधामध्ये वाळलेला अंजीर उकळवून सेवन केल्याने सकाळी दस्त साफ होते. २. अंजीर खाल्यावर हाडे मजबूत होतात. कारण यात भरपूर मात्रा मध्ये कॅल्शिअम असते. यामुळे हाडांचे दुखणे बंद होते तसेच मानवी शरीरातील हाडे मजबूत बनतात. ३. अंजीरला आयरनचे एक चांगले स्त्रोत मानले जाते. शरीरात आयरनच्या कमीमुळे ऐनिमियाचा धोका वाढतो. तसेच रक्ताची कमी भासते. आणि या समस्यांना दूर ठेवण्यासाठी वाळलेल्या अंजीर पेक्षा चांगले काहीच नाही.